# नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दिनांक 08/05/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक 08/05/2026 रोजी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

बैठकीत बैठकीपूर्वी निर्गमित केलेल्या संलग्न विषय पत्रिकेनुसार चर्चा झाली. विविध विषयांवर चर्चा होण्यापूर्वी मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, सर्व कामे ही शासनामार्फत मान्य झालेल्या कुंभमेळा योजनेत आणि मंत्री समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे असावीत. अन्यथा त्याला त्याप्रमाणे मान्यता त्वरित घ्यावी. तसेच कोणत्याही कामाची द्विरुक्ती नाही अथवा नियोजनात खंड (gaps) नाहीत याची दक्षता घ्यावी. कामाच्या मान्यतेपूर्वी तांत्रिक मान्यता व इतर आवश्यक पूर्तता केल्याबाबत चर्चा झाली असता अशी खात्री केल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले.

अध्यक्ष यांनी सर्व विभागांना निर्देशित केले की, अधून मधून थोडी - थोडी कामे प्रस्तावित करण्यापेक्षा आवश्यकतेनुसार सर्व कामे त्वरित एकदाच प्रस्तावित करावी जेणेकरून कुंभमेळा योजनेला अंतिम स्वरूप देणे शक्य होईल.

**विषय क्र.1:- नाशिक जिल्हा परिषदेची जुनी इमारत कुंभमेळा प्राधिकरणाचे कार्यालयासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात आली असुन जागेचे वाजवी भाडे निश्चित करणेबाबत.**

कुंभमेळा आयुक्त यांनी जिल्हा परिषद, नाशिक यांची जुनी इमारत कुंभमेळा प्राधिकरणाचे कार्यालयासाठी भाडेतत्वावर प्रति महिना रक्कम रु.24,96,256/- इतके भाडे दर जिल्हा परिषदेने कळविले आहे. तथापि प्राधिकरणाचे कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) नाशिक यांना इमारतीचा भाडे दर निश्चित करणेकामी कळविलेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रति महिना रक्कम रु. 8,27,893/- भाडे दर निश्चित केला आहे. तरी यामधील तफावत दुर करुन वाजवीभाडेदर ठरविणेबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी जिल्हा परिषदेला वाजवी भाडे उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन जिल्हा परिषदेच्या नविन इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी मदत होईल, अशी विनंती केली. तसेच सदर जुन्या जिल्हा परिषदेच्या आवारात MSIDC या कार्यालयाने 250 चौ. मी. इतके रु.1,96,000/- दराने उपलब्ध करुन देण्यात आलेले असल्याबाबतची माहिती दिली. जुन्या इमारतींमध्ये कुंभमेळा प्राधिकरणाकडून कुंभमेळा कक्षासाठी जवळपास रु.7.00 कोटी खर्च करण्यात येत असल्याची बाब कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केली. याबाबत सर्व माहिती विचारात घेऊन जिल्हा परिषद व कुंभमेळा प्राधिकरण यांच्यातील भाडे दरामधील तफावत दूर करुन वाजवी दराबाबत पुनर्विचार (rationalization) करण्यात आला. वरील पार्श्वभूमी पाहता आणि एकंदरीत व्यवहार हा शासन ते शासन (G to G) स्वरूपाचा असल्याचे पाहता सहसंचालक, लेखा व कोषागारे यांनी त्याला मान्यता देण्यास हरकत नाही असे सांगितले.

सबब, कुंभमेळा प्राधिकरणाचे कार्यालयासाठी जिल्हा परिषदेची जुनी इमारत भाडेतत्वावर घेण्यात आली असून सदर इमारतीचे वाजवी भाडेदर पुर्वलक्षी प्रभावाने रु.18.00 लक्ष रुपये प्रतिमाह ठरविण्यास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.2:- आपत्ती व्यवस्थापनासाठी १५,०००/- स्वयंसेवकांना प्रशिक्षण प्रस्ताव/ EOI.**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिवस रु.1800 प्रमाणे 6 दिवसांचे निवासी/ अनिवासी प्रशिक्षण घेणे प्रस्तावित आहे. सदरचे दर ठरविण्याचे निकष कोणते वापरण्यात आले याची मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरचे दर हे यशदा संस्थेशी निगडीत शासन निर्णय दिनांक 21/09/2023 अन्वये ठरविण्यात आलेल्या दराच्या अनुषंगाने सदरचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

यावर मा.अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की, निवीदा प्रक्रियेत सदरचे दर कमी होणे शक्य आहे काय? यावर सहसंचालक लेखा व कोषागारे यांनी माहिती दिली की, सदर कामाचे निवीदा प्रक्रिया करतांना EOI पध्दतीचा वापर करण्यात आल्यामुळे पुरवठादारादरम्यान दर कायम ठेवून (रु.1800) स्पर्धा ही पुरवठादाराचे तांत्रिक सक्षमता व मनुष्यबळ व इतर पायाभुत सुविधा या करीता 70 गुण व पुरवठादाराचे सादरीकरण यास 30 गुण असे गुणांकन करुन करण्यात येणार आहे.

यावर मा.अध्यक्ष महोदयांनी याबाबत इतर संस्था (यशदा) यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन कार्यवाही करावी असे निर्देश दिले. तसेच मा.अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की प्रयागराज येथील सदर प्रशिक्षणाबाबत वापरण्यात आलेल्या कार्यपध्दतीचाही अभ्यास करण्यात यावा. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले की प्रयागराज याठिकाणी सर्व प्रशिक्षणे वेगवेगळया प्रकारे घेण्यात आली होती. अशाप्रकारचे प्रशिक्षण पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे तरीही आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

मा.अध्यक्ष यांनी निविदाबाबत नियमांची पुन्हा खात्री करुन नियमानुसार कार्यवाही करुन प्रक्रिया राबवावी असे निर्देर्शित केले. सदर अटीच्या अधिन राहून रक्कम रु.17.00 कोटीच्या कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.3:- कुंभमेळा नियोजनासाठी आवश्यक असलेल्या खालील बाबीं प्राधिकरणाचे अवलोकनार्थ सादर. अ) घाट व होल्डिंग क्षेत्रांचे नियोजन. ब) पार्किंग व्यवस्थापन.**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, कुंभमेळा नियोजनासाठी घाट व होल्डिंग क्षेत्रांचे नियोजन आणि पार्किंग व्यवस्थापनाबाबत करण्यात आलेल्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. तथापी वेळेअभावी आज सादरीकरणे करता येणार नाही असे सांगितले. यावर मा.अध्यक्ष यांनी याबाबत स्वतंत्रपणे बैठक घेऊन चर्चा करुया असे सांगितले.

**विषय क्र.4:- कुंभमेळा प्राधिकरणात बाह्ययंत्रणेद्वारे / जाहिरातीव्दारे विषय तज्ञ / सल्लागार नेमणुक करणेबाबत. (गुणवत्ता नियंत्रण सल्लागार, आपत्ती व्यवस्थापन सल्लागार, विधी सल्लागार, IIT MUMBAI)**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की,गुणावत्ता नियंत्रण सल्लागार म्हणुन श्री. किशोर पाटील यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. सहसंचालक लेखा व कोषागारे यांनी माहिती दिली की, निवृत्त शासकीय अधिका-यांना प्राधिकरणाच्या नियमित पदांवर घेणे शक्य नसून त्याजागी शासनाकडून नियमित पद दिले जाऊ शकेल. तरी श्री. किशोर पाटील यांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर गुणवत्ता नियंत्रणाकरीता तज्ञ सल्लागार म्हणुन करता येईल (मंजूर सल्लागार पदे- 8 असल्याची माहिती दिली).

मा. अध्यक्ष महोदयांनी यावर त्यांचे पदनाम फक्त भिन्न राहील काय अशी विचारणा केली. यांस कुंभमेळा आयुक्त यांनी सहमती दर्शवली. कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, आपत्ती व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीचाही प्रस्ताव असून सदर पदावर यशदाचे मास्टर ट्रेनर श्री.सुपणेकर यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगीतले. तसेच विधी सल्लागार म्हणुन एका व्यक्तीची/संस्थेची निवड करावयाची असून त्याबाबत जाहिरात प्रसिध्द केल्याचे सांगितले.

तसेच IIT MUMBAI ला काही निवडक प्रकल्पांच्या गुणावत्ता तपासणीसाठी घेण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती कुंभमेळा आयुक्त यांनी दिली. परंतु त्यांनी त्यांचे तपासणीचे दर 1.5 टक्के (प्रकल्प किंमतीच्या) एवढे जास्त दिले आहेत. तरी त्यांचेशी याबाबत वाटाघाटी करण्यात आल्या असून तो दर कमी प्राधिकरणाकडून त्रयस्थ तपासणी (गुणावत्ता व परीक्षण) यंत्रणा म्हणून नियुक्त संस्थेला देण्यात आलेल्या 0.39 टक्के दरानेच परीक्षण देण्याबाबत IIT Mumbai यांनी कामाला होकार दिला असल्याचे कळविल्यात आले. सबब कुंभमेळा प्राधिकरणाचे वतीने गुणवत्ता नियंत्रण सल्लागार, आपत्ती व्यवस्थापन सल्लागार, विधी सल्लागार, IIT Mumbai चे सल्लागार यांच्या नियुक्तीबाबत रु.4.74 कोटी इतक्या रकमेच्या कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.5:- जनार्दन स्वामीमठ (छ. संभाजीनगर रोड) ते लक्ष्मी नारायण मंदिर पूल ते ड्रीमसिटी चौका पावेतो 30 मी विकास रस्ता विकसित करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

शहर अभियंता, नाशिक महानगरपालिका यांनी जनार्दन स्वामीमठ (छत्रपती संभाजीनगर रोड) ते लक्ष्मी नारायण मंदिर पूल ते ड्रीमसिटी चौका पावेतो 30 मी विकास रस्ता विकसित करण्याबाबत माहिती दिली व सादरीकरण केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरचे काम यापुर्वी मंजूर असून सदर कामाला रक्कम रु.15.00 कोटी निधीची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. परंतु कुंभमेळयाचा मुख्य रस्ता म्हणुन सदर कामाची व्याप्ती वाढली असून कामाचे महत्व लक्षात घेता जुनी प्रशासकीय मान्यता रद्द करुन नव्याने प्रशासकीय मान्यता देणे संयुक्तिक होईल असे सांगितले.

सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.36.00 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.6:- कुंभमेळा 2027-28 मध्ये उभारण्यात येणा-या प्रस्तावित साधुग्राम करीता पाणी पुरवठा व्यवस्था करणेकरीता गंगापूर धरण पंपिग स्टेशन व विविध जलशुध्दीकरण केंद्र येथे पंपिंग मशिनरी पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

सदर विषय यापुर्वी प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात आले असलेबाबत मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी यापुर्वी प्राधिकरणाच्या दि.10/03/2026 रोजीच्या बैठकीत सदर कामास शिखर समितीकडे यथोचित मार्गाने सादर करण्यात यावा व त्यानंतरच पुढील निर्णय घेण्यात येईल, असे निर्देश दिले असलेबाबत सांगीतले. त्यानुसार सदर काम हे शिखर समिती समोर ठेवण्यात आले होते त्यास शिखर समितीने मान्यता दिली असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले.

सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.28.68 कोटीच्या कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.7:- कुंभमेळयासाठी शौचालये भाडेतत्वावर घेण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

कुंभमेळा आयुक्त यांनी सदरचा विषय तूर्त चर्चेसाठी घेण्यात येऊ नये अशी विनंती केली. त्यानुसार सदरचा विषय निर्णय न घेता पुढे ढकलण्यात आला.

**विषय क्र.8:- कुंभमेळयासाठी कचरा कुंड्यांची (डस्टबिन्स) खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

कुंभमेळा आयुक्त यांनी सदरचा विषय तूर्त चर्चेसाठी घेण्यात येऊ नये अशी विनंती केली. त्यानुसार सदरचा विषय निर्णय न घेता पुढे ढकलण्यात आला.

**विषय क्र.9:- कुंभमेळयासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर शहरांमध्ये 'पेंट माय सिटी' अभियान राबविणेबाबत..**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, शहरातील जुने घाट, वारसा स्थळे, उड्डाणपूल आणि पोहोच रस्ते यांचे रंगकाम या प्रकल्पांतर्गत केले जाईल तसेच जुना रंग खरवडून पृष्ठभाग गुळगुळीत करणे, प्रायमिंग करणे आणि सीलरचा वापर करून नवीन रंगकाम करणे ही पद्धत अवलंबली जाईल.

तसेच प्रकल्पातील १० % कामात स्थानिक कलाकार, स्वयंसेवी संस्था आणि समुदायाचा सक्रिय सहभाग अनिवार्य असेल. हे काम एकाच एजन्सीला न देता कामाची व्याप्ती पाहता अनेक एजन्सींमध्ये विभागले जाईल असे सांगितले.

सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.25.00 कोटीच्या कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.10:- कुंभमेळा २०२७ साठी संकेतस्थळ (Website) व मोबाईल ॲप्लिकेशन (Android व iOS) विकसित करणे.**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सामान्य नागरिकांना वापराकरीता सुलभता यावी व सर्व माहिती व सुविधा एकाच ठिकाणी मिळावी यासाठी कुंभमेळा प्राधिकरणाचे संकेतस्थळ (Website) व मोबाईल ॲप्लिकेशन (Android व iOS) विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

मा.अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की, सदर मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करुन होमस्टे, लॉज, हॉटेल इत्यादीचे बुकिंग शक्य आहे काय? तसेच याबाबत सुरक्षा विषयक घटकांचा विचार करण्यात आला आहे काय? याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरचे ॲप्लिकेशन हे टेन्ट सिटी च्या बुकिंगपुरते मर्यादित वापरासाठी तयार करण्यात येणार असून होमस्टे, लॉज, हॉटेल इत्यादीचे बुकिंसाठी वापरण्यात येणार नाही. तसेच लॉज, हॉटेल इत्यादी ठिकाणांच्या सुरक्षाविषयक बाबीची खबरदारी घेण्याचे काम पोलीस प्रशासनाचे असणार आहे.

सदर विषयावर चर्चा झाली आणि सर्व हितधारकांसाठी सदरचे संकेतस्थळ व मोबाईल ॲप्लिकेशन हे single stop solution असेल आणि याच्यातील public data आवश्यक ती कायदेशीर तरतुदींचे पालन करून API च्या माध्यमातून सर्व इच्छूक शासकीय आणि खासगी app/ websites ना मोफतरित्या आवश्यक ती तांत्रिक आणि कायदेशीर काळजी घेऊन पुरवण्यात येईल असे सांगण्यात आले.

प्राधिकरणाने सदर बाबीस रक्कम रु.5.00 कोटी ची प्रशासकीय मान्यता दिली. याबाबतचे सविस्तर सादरीकरण नंतर करण्यात यावे असे सांगितले.

**विषय क्र.11- त्रिंबक नगरपरिषद हद्दीत वाढीव भुयारी गटार मलनिस्सारण योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देणे.**

कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, नदीपात्रात होणारा काही ठिकाणांवरील व काही खाजगी घरांव्दारे होणारे मलनिस्सारण रोखण्यासाठी सदरचे काम आवश्यक असल्याचे सांगीतले.

सदर बाब महत्वाची असून त्यास प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.29.55 कोटीच्या कामास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.12:- मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी/ आयत्या वेळी येणारे कोणतेही विषय.**

**अ)** नवश्या गणपती जवळ घाटाचे बांधकाम करणे या कामात तांत्रिक कारणास्तव नावात बदल आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. मा.अध्यक्ष महोदयांनी याबाबत यापुर्वी दिलेल्या प्रशासकीय मान्यता आदेश व सोबत जोडण्यात आलेल्या सर्व दस्तावेज यांचा अभ्यास करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या.

**ब)** कुंभमेळा आयुक्त यांनी आयत्या वेळच्या विषयात M/s TUV SUD South Asia PVT. LTD या कंपनीच्या कामांच्या व्याप्तीत (scope) वाढ करणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली की, सदर संस्थेसोबत केलेल्या करारात कामांच्या व्याप्तीत वाढ करण्याबाबतची तरतुद ठेवण्यात आली आहे काय? यावर कुंभमेळा आयुक्त यांनी सदरची तरतुद असलेबाबत व M/s TUV SUD South Asia PVT. LTD कंपनीला देण्यात आलेल्या रु.5133.77 कोटीच्या कामांच्या तपासणीच्या व्याप्तीत वाढ करुन साधारणपणे रु.11,000/- कोटींची कामे तपासणीसाठी

देणे आवश्यक आहे. तसेच शिखर समितीत चर्चा झाल्याप्रमाणे सदरच्या कामांचे गुणवत्ता तपासणी कुंभमेळा प्राधिकरणाकडून करणे अपेक्षित असल्यामुळे राज्य शासनाच्या निधीतून मंजूर कामांच्या तपासणीचे काम सदर M/s TUV SUD South Asia PVT. LTD याच कंपनीकडून करुन घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले व त्यानुसार प्राधिकरणाच्या वतीने कामाची व्याप्ती वाढविण्यास मान्यता देण्यात आली.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 18-05-2026 19:52:17

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**